तार : 'EDUTECH'

दूरध्वनी : २६२ ०६०१-०२-०७
२६२ १७२६ (वं)
२६२ ०००७
टेलेक्स : ११८२४९७ डीटीईइन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१

क्रमांक- २/एनजीपी/१०९३/११०५/१६१४८

दिनांक- 28 MAY 1993

प्रति,

अध्यक्ष,
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे
वाघिरे औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय,
एरंडवणे, पौड रस्ता,
पुणे - ४११ ०३८.

विषय:- औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी.

संदर्भ :- शासनाचे उच्च वतंत्र शिक्षण आणि सेवा योजन विभागाचे पत्र क्र. पीसीआय/१०८९/१२८७६/[३७४८]/तांशि-१, दिनांक २७ मे, १९९३.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणास कळविण्यांत येते कीं, शासनाने शासनाच्या संदर्भाधिन पत्रान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष १९९३-९४ पासून विना अनुदान तत्वावर औषध निर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम खालील अटींच्या अधिन राहून ६० प्रवेश क्षमतेसह सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे.

१] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-टीईएम/३३८२/१११८३६/[१९०]/तांशि-१, दिनांक २१.५.१९८३ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मार्गदर्शक तत्वे बंधनकारक रहातील.

२] संस्थेचे नियामक मंडळ स्थापन करुन सदर मंडळाच्या अध्यक्षांची नेमणूक अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानके व प्रमाणकानुसार करण्यांत यावी.

३] अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने/ शासनाने/ संचालक तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई व पुणे विद्यापीठ यांनी विहित केलेल्या मानका व प्रमाणकांनुसार आवश्यक त्या शैक्षणिक सुविधा, साधनसामग्री, प्रशिक्षित शिक्षक वर्ग, तसेच जागे-बाबतची तरतूद करणे आवश्यक आहे.

४] अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क शासन नियमानुसार ठरविण्यांत यावे.

५] अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या क्रमांक-एफ-२७-१०/ ९३-ए. आय. सी. टी. ई/४६९, दिनांक १२. ४. १९९३ च्या मंजूरी पत्रात विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.

६] संस्था चालक व संचालक तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे संयुक्त खाते संस्थेने सदर अभ्यासक्रमाकरिता, युनियन बँक ऑफ इंडिया येथे पावती क्रमांक- ५४११९३६/३०३९, दिनांक २८. ५. १९९३ अन्वये रुपये २,००,०००/- [ रुपये दोन लाख ] जमा केलेले आहेत.

७] शासनाने/ अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व संचालक तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, यांनी विहित केलेल्या सर्व अटी मान्य असल्याबाबतच्या करारनामा आपल्यास करावा लागेल.

८] शासनाने, संचालक तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, व पुणे विद्यापीठ, पुणे यांनी मान्य केलेल्या प्रवेश नियमानुसारच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत यावा.

९] प्रवेश देतांना विद्यार्थ्यांकडून कोणत्याहि प्रकारच्या देणग्या स्विकारण्यांत येऊ नयेत.

१०] संस्थेच्या संदर्भाधीन अभ्यासक्रमाकरिता, पुणे विद्यापीठ, पुणे यांनी संलग्नीकरणास मान्यता दिल्यानंतरच संस्थेत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत यावा.

आपला विश्वासू

[ भा. बा. चोपणे ]
संचालक तंत्र शिक्षण
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

वैद्य/-२८.५